**Government of Maharashtra**

**GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL,MIRAJ**

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,मिरज

Tel:0233/2232090-99/2231158 Fax:2231959 E-mail:-deangmcmiraj@yahoo.co.in

जा.क्रं.शावैमरुमि/आस्था/विनिमं/वै.अ/रिक्तपदे/कंत्राटी/ ३५५३-६९ /२५ दिनांक :- २२/०५/२०२५

## // जाहिरात //

विषय :- गट-ब संवर्गातील वैद्यकीय अधिकारी कंत्राटी तत्वावर रिक्त पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत.

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज** येथील रिक्त झालेली/होणारी वैद्यकीय अधिकारी गट-ब संवर्गातील, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक: एमईडी-२०१९/प्र.क्र.२६२/वैसेवा- ३, दिनांक ३१ डिसेंबर, २०२० नुसार शैक्षणिक अर्हतानुसार दरमहा निश्चित केलेल्या मानधनानुसार खालील रिक्त पदे संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेकडून मध्यवर्ती समितीच्या शिफारशीनुसार बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरुस्कृत उमेदवाराची नियुक्ती होईपर्यत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात स्थानिक निवड समिती मार्फत १२० दिवसांकरीता गुणवत्तेनुसार भरण्यासाठी बंधपत्रित व अबंधपत्रित वैद्यकीय अर्हता प्राप्त उमेदवारांकडून दिनांक २६.०५.२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता थेट मुलाखती व्दारे भरण्याबाबत समितीची बैठक आयोजित केली आहे.

अर्जाचा विहित नमुना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज येथील आस्थापना विभागात दिनांक २२.०५.२०२५ ते २६.०५.२०२५ अखेर कार्यालयीन वेळेत निशुल्क मिळेल.

अर्ज सादर करते वेळी उमेदवार तात्पुरत्या सेवेने शासकीय/अशासकीय सेवेत कार्यरत असल्यास त्यांनी अर्ज विभाग प्रमुखांमार्फत सादर करावा, तसेच अन्य कोणत्याही रुग्णालयात कार्यरत असल्यास त्याबाबतचे संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र अथवा सेवासमाप्तीचे आदेश जोडण्यात यावेत अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**स्थानिक निवड मंडळामार्फत भरावयाच्या वैद्यकीय अधिकारी गट-ब संवर्गातील रिक्त पदांची माहिती.**

| अ.क्र. | संस्थेचे नांव | पदाच्या संवर्गाचे नाव | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| ०१ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, मिरज | वैद्यकीय अधिकारी गट-ब | ०३ |

**वैद्यकीय अधिकारी या पदासाठीचे निकष खालील प्रमाणे राहतील.**

०१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज येथून उत्तीर्ण झालेले पदवी अर्हता धारक
०२) महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले पदवी अर्हता धारक (महानगरपालिकेच्या महाविद्यालयासह)
०३) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठ,नाशिक येथून उत्तीर्ण झालेले पदवी अर्हता धारक
०४) इतर अभिमत विद्यापिठातून उत्तीर्ण झालेले पदवी/पदव्युत्तर पदवी अर्हता धारक.
०५) बंधपत्रित उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

(कृ.मा.प)

अ) शैक्षणिक अर्हता :- मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी

ब) वयोमर्यादा :- खुल्या प्रवर्गासाठी ४० वर्षे व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४५ वर्षे.

क) वेतनश्रेणी :- शासन निर्णय क्रमांक: एमईडी-२०१९/प्र.क्र.२६२/वैसेवा- ३, दिनांक ३१ डिसेंबर, २०२० नुसार शैक्षणिक अर्हतानुसार दरमहा निश्चित केलेल्या मानधनानुसार

उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. मुलाखत ही दिनांक २६.०५.२०२५ रोजी सायं.४.०० वाजता अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज येथे होईल. मुलाखतीसाठी स्वतंत्र पत्र पाठविले जाणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच ज्या उमेदवारांनी सदर जाहिरातीपूर्वी अर्ज सादर केले असतील त्यांनी सदर जाहिरातीनुसार पुन:श्च विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक ते प्रमाणपत्रे साक्षांकित करुन सादर करणे आवश्यक राहिल. तसेच रिक्त पदसंख्या कमी जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही करीता त्यासाठीचे सर्व अधिकार अधिष्ठातांनी राखुन ठेवले आहेत.

**अधिष्ठाता,**
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,मिरज

प्रति,
१) सर्व प्राध्यापक व विभाग प्रमुख,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज
२) वैद्यकीय अधिक्षक,शावैमरु.मिरज/पवपाशारु.सांगली.
१) नोटीस बोर्ड- आय.एच.आर.होस्टेल, बाहयरुग्ण विभाग, मिरज-सांगली/अधिष्ठाता कार्यालय/ ग्रंथालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज/पवपाशारु.सांगली
२) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/मुंबई,पुणे, सोलापुर, कोल्हापूर, अंबाजोगाई, लातूर, नांदेड, अकोला,यवतमाळ, नागपूर, धुळे, औरंगाबाद, चंद्रपूर, गोंदिया.
प्रतः अधिष्ठाता, पद्‌भूषण वसंतदादा पाटील शासकीय रुग्णालय,सांगली./शा.वै.महाविद्यालय,मिरज.
प्रतः माहितीसाठी सविनय सादर.
१) मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,गो.ते.रुग्णालय संकुल, ९ वा मजला, मुंबई-०१
२) मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-१